Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education,
Kolhapur Divisional Board,
539, Rajendranagar,
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
५३९, राजेंद्रनगर,
कोल्हापूर - ४१६००४

Ph. No. (0231) 2696101/ 2 / 3 Website - www.sscboardkolhapur.in Email - divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/लेखा/दुष्काळ-2023/परीक्षा फी फेब्रु/मार्च 2024/422 दिनांक : 03 / 02 / 2025

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली व कोल्हापूर जिल्हे.

**विषय : सन 2023-2024 मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील इ.10 वी व 12 वीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेकरिता उर्वरित विद्यार्थ्यांचे बँक खाते व अनुषंगिक माहिती सुधारित करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल दिनांक 03 फेब्रुवारी ते दिनांक 14 फेब्रुवारी, 2025 या कालावधीत उपलब्ध असल्याबाबत.**

**संदर्भ** : 1) शासन निर्णय क्र.एससीवाय-2023/प्र.क्र.37/म-7, दि. 31.10.2023 व 10.11.2023.
2) शासन निर्णय क्र. संकीर्ण 2019 / प्र.क्र.47 / एसडी-5, दिनांक 01.08.2019 व शुध्दीपत्रक दिनांक 03.02.2020.
3) क्र.रा.मं./सन 2023 दुष्काळ ख.हं./439, दि. 31.01.2025.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय दिनांक 01.08.2019 व शुध्दीपत्रक दिनांक 03.02.2020 अनुसार सन 2023-24 मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील इ.10 व इ.12 वीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परतावा विद्यार्थी / पालकांच्या **"आधार संलग्न बँक खात्यात"** सन 2023-24 व 2024-25 या आर्थिक वर्षात एकूण 8 लॉटद्वारे विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क परतावा देण्यात आलेला आहे.

तथापि ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क त्यांचे **"आधार संलग्न बँक खात्यात"** वर्ग झाले नाहीत अशा बँकेकडून Reject झालेले अथवा परीक्षा शुल्क परतावा न झालेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परतावा करण्याकरिता **पात्र विद्यार्थ्यांचे आधार लिंक असलेले बँक खाते क्रमांक तपशील व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड इ. माहिती दुरुस्त / सुधारित करण्याकरिता** इ. 10 वी साठी http://feerefund.mh-ssc.ac.in आणि इ.12 वी साठी http://feerefund.mh-hsc.ac.in या ऑनलाईन लिंक दिनांक 03.02.2025 ते 14.02.2025 या कालावधीत सुरु करण्यात येत आहे.

तरी या पूर्वी परीक्षा शुल्काचा परतावा न झालेल्या पात्र विद्यार्थ्यांचे आधार लिंक असलेल्या बँक खात्याचा अचूक तपशील व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड इ.बाबतची माहिती दिनांक 03.02.2025 ते 14.02.2025 या कालावधीत उपरोक्त ऑनलाईन लिंकवर भरण्याची कार्यवाही गांभियाने व अचुकपणे करण्यात यावी. तसेच कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षा शुल्काचा परतावा मिळणेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत :

1. मा. शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, हत्ती महल, सोमवारपेठ, कोल्हापूर
2. शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, सातारा / सांगली / कोल्हापूर

D/Ansar/Dushkal 23-24/Letter